21 FEB 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून विज्ञान जागृती सप्ताह

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या वैज्ञानिक व तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण (एसटीयुटीआय) कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारीदरम्यान विज्ञान जागृती सप्ताह आयोजित केला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या एसएआयएफ-डीएसटी केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

राजर्षी शाहू सभागृहामध्ये सप्ताहाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे व विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार शाम सुंदर कोहली यांच्या उपस्थितीत होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रास्ताविक करणार आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षानिमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम देशभरात प्रदेशात सुरू आहे. याअंतर्गत केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, यासाठी १३ केंद्रांवर हा उपक्रम राबविला जात आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकमेव समावेश या उपक्रमात आहे.

सप्ताहात अनुक्रमे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. आर. के. कामत, प्रा. व्ही. ए. बापट, लेखिका डॉ. माधुरी शानभाग, डॉ. एम व्ही टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोशच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा यांचे व्याख्यान होणार आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे विशेष प्रयत्न सुरू आहेत. यासाठीच विद्यापीठाच्या अनेक उपक्रमांत डॉ. सोनकवडे यांनी केलेल्या सादरीकरणामुळेच विद्यापीठाचा समावेश या सप्ताहामध्ये केला आहे. कोविड नियमावली पाळून विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठात उद्यापासून स्पर्धा परीक्षा ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने 'मी पीएसआय, एसटीआय होणार' या विषयावर दि. २२ फेब्रुवारीपासून ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत विजयश्री फाऊंडेशनचे जॉर्ज क्रूझ, इस्लामपूरचे डॉ. अनिल सत्रे मार्गदर्शन करणार आहेत. २५ फेब्रुवारीपर्यंत कार्यशाळा चालणार आहे. कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे निमंत्रक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

21 FEB 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे उद्या उद्घाटन

## विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ- डीएसटी केंद्राच्या वतीने २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन २२ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार शाम सुंदर कोहली, 'तरुण भारत'चे समूहप्रमुख व सल्लागार संपादक किरण ठाकूर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती एसएआयएफ- डीएसटी केंद्राचे संचालक डॉ आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

### विज्ञान आणि तंत्रज्ञानाला प्रोत्साहन मिळावे

भारताच्या विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा यासाठी शिवाजी विद्यापीठतील एसएआयएफ- डीएसटी केंद्राचे संचालक डॉ आर. जी. सोनकवडे ᵽ विशेष प्रयत्न करीत आहेत. यासाठीच विद्यापीठाच्या अनेक उपक्रमामध्ये डॉ. सोनकवडे यांनी केलेल्या सादरीकरणामुळेच विद्यापीठाचा समावेश विज्ञान जागृती सप्ताहामध्ये झाला आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशातील सर्व राज्यात विज्ञान सप्ताहाचे आयोजन केले आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे यासाठी देशभरातील १३ केंद्रांवर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये राज्यातील शिवाजी विद्यापीठ एकमेव केंद्र आहे. या सप्ताहात शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही एन. शिंदे, डॉ. आर के कामत, जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. व्ही. ए. बापट, विज्ञान विषयक लेखिका डॉ. माधुरी शानभाग, भौतिक शास्त्र विभागाचे डॉ. टाकळे, मराठी विज्ञान विश्वकोश मंडळाच्या जीवशास्त्र ज्ञानमंडळाचे अध्यक्ष डॉ. मोहन मदवण्णा यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. १४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे ७०० विद्यार्थी सहभागी नोंदवणार आहेत.